CMYK

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

**सुविचार**
जग तुम्हाला कसं पाहतं हे महत्त्वाचं नाही, तुम्ही स्वतःला कसं पाहता हे महत्त्वाचं आहे.

SS MOBILE®
धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक मोबाईल विक्री होणारे, विश्वसनीय ठिकाण.
(नवनवीन ऑफर जाणून घेण्यासाठी आजच संपर्क करा)
जिजाऊ चौक, बार्शी नाका, धाराशिव.
Mo.7841810075/8329723615

कोल्हापूर | सांगली | सातारा | सोलापूर | धाराशिव | लातूर | वर्ष 3 रे | अंक 52 | बुधवार, 13 मे 2026 | पाने 04 | किंमत रू.4 | epaper.arambhmarathi.com

# ४ लाख शेतकऱ्यांना ३३६ कोटींचा पीकविमा

## आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची माहिती

आरंभ मराठी । धाराशिव



**२०२५ च्या खरीप पीकविम्यावरून मागील अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या तांत्रिक वादाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. विमा कंपनीचे आक्षेप राज्यस्तरीय समितीने फेटाळून लावल्यानंतर आता धाराशिव जिल्ह्यातील ४ लाख ५ हजार ४४ शेतकऱ्यांच्या खात्यात तब्बल ३३६ कोटी ४६ लाख रुपयांचा पीकविमा जमा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ही माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.**



खरीप २०२५ हंगामासाठी धाराशिव जिल्ह्यात आयसीआयसीआय लोंबार्ड ही विमा कंपनी कार्यरत होती. जिल्ह्यातील ५५ विमा युनिटमधील ३६८ पीक कापणी प्रयोगांवर कंपनीने तांत्रिक आक्षेप घेत राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडे धाव घेतली होती. पीक कापणी प्रयोग नियमबाह्य झाल्याचा दावा कंपनीने केला होता. मात्र जिल्हाधिकारी स्तरावर हे आक्षेप आधीच फेटाळण्यात आले होते. या प्रकरणात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी थेट कृषी विभागाचे प्रधान सचिव परिमल सिंग यांची भेट घेत पाठपुरावा केला. परिमल सिंग हे निवडणूक कर्तव्यासाठी राज्याबाहेर असतानाही ऑनलाईन सुनावणी घेण्यात आली. सुनावणीत विमा कंपनीला पुरावे सादर करता आले नाहीत.

त्यामुळे जिल्हा समितीचा २२ डिसेंबरचा निर्णय कायम ठेवत कंपनीचे सर्व आक्षेप फेटाळण्यात आले. त्यानंतर कृषी आयुक्तालयाने पात्र शेतकऱ्यांचे दावे तातडीने निकाली काढण्याचे आदेश दिले आहेत. जिल्ह्यात सोयाबीन हे मुख्य पीक असून सर्वाधिक ४ लाख ४० हजार ४४ शेतकऱ्यांनी विमा उतरवला होता. त्यापैकी सुमारे ४.०५ लाख शेतकऱ्यांना ३३६ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. "शेतकऱ्यांच्या कष्टाचे पैसे त्यांच्यापर्यंत पोहोचावेत यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. विमा कंपनीने घेतलेली स्थगिती उठल्याने आता बळीराजाला मोठा दिलासा मिळणार आहे. संकटकाळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे हेच आपले कर्तव्य आहे," असे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे. दरम्यान, २०२५ मधील अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या ७ लाख १३ हजार ८७१ शेतकऱ्यांना यापूर्वीच ५२४ कोटी ७८ लाख रुपयांची मदत वितरित करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. यात जून महिन्यातील नुकसानीसाठी २२ लाख रुपये, जुलै-ऑगस्टमधील नुकसानीसाठी १८९ कोटी ६१ लाख रुपये, सप्टेंबरमधील नुकसानीसाठी २९२ कोटी ४९ लाख रुपये आणि अतिरिक्त नुकसानीसाठी ४२ कोटी ४६ लाख रुपयांचा समावेश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# सर्वसाधारण सभेत जिल्हा परिषदेच्या मालमत्तांवरील अतिक्रमणाचा मुद्दा गाजला

- गाव तिथे अभ्यासिका आणि केंद्रीय विद्यालय सुरू करण्याचा निर्णय
- नळाला पाणी आल्यावरच जलजीवनच कामाची बीले काढण्याचा निर्णय
- पाच तास चालली सर्वसाधारण सभा

आरंभ मराठी । धाराशिव

**धाराशिव जिल्हा परिषदेच्या मंगळवारी (दि.१२) आयोजित केलेल्या सर्वसाधारण सभेत जिल्हा परिषदेच्या मालमत्तांवरील अतिक्रमणासह विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. तब्बल पाच तास चाललेल्या या सभेत गाव तिथे अभ्यासिका सुरू करणे, केंद्रीय विद्यालय सुरू करणे तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये स्वच्छतागृह सुरू करण्याच्या मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाली. संपूर्ण सभेत मात्र जिल्हा परिषदेच्या मालमत्तांवर करण्यात आलेल्या अतिक्रमणाचा मुद्दा केंद्रस्थानी राहिला.**

जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी दुपारी दोन वाजता सुरू झालेली सर्वसाधारण सभा रात्री सात पर्यंत सुरू होती. सभेच्या सुरुवातीलाच दाळिंब येथील सदस्य महंमद रफी तांबोळी यांनी संपूर्ण जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या मोक्याच्या जागी असलेल्या मालमत्तांवर करण्यात आलेल्या अतिक्रमणाचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी पाच मोठ्या मालमत्तांचा उल्लेख करत हा मुद्दा मांडला. काही ठिकाणी जिल्हा परिषदेच्या मालकीची जागा महसूलकडे वर्ग करण्यात आली आहे, तर काही ठिकाणी खाजगी लोकांनी त्यावर अतिक्रमण केल्याचे ते म्हणाले. यावेळी अर्चनाताई पाटील यांनी सर्व विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांनी पुढच्या सर्वसाधारण सभेच्या अगोदर आपापल्या जागांचे रेकॉर्ड व्यवस्थित बनवण्याचे आदेश दिले. यावेळी जिल्हा परिषद शाळांमधील स्वच्छतागृह, जलजीवनची रखडलेली कामे, शालेय गणवेश तसेच केंद्रीय विद्यालय आणि गाव तिथे अभ्यासिका या मुद्द्यावर चर्चा केली. उशिरापर्यंत सभा सुरू असल्यामुळे पाचनंतर सत्ताधारी पक्षातील बरेच सदस्य अर्ध्यातूनच उठून गेले. या बैठकीला अध्यक्ष अर्चनाताई पाटील, उपाध्यक्ष उषाताई गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदाळकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) तुकाराम भालके, सर्व विषय समित्यांचे सभापती, जिल्हा परिषदेचे सर्व सदस्य, सर्व विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.



### जिल्हा परिषदेचे 60 गाळे नव्याने बांधण्याचा निर्णय

शहर पोलिस स्टेशनच्या समोर जिल्हा परिषदेच्या मालकीचे 21 गाळे आहेत. 1995 मध्ये त्याचे बांधकाम करण्यात आले होते आणि ते गाळे भाड्याने देण्यात आले होते. मात्र अनेक चालकांनी गाळ्यांचे भाडे भरले नाही. सध्या 32 लाख रुपये मूळ भाडे आणि 14 कोटी 41 लाख थकबाकी थकीत आहे. सर्व थकबाकी वसूल करून ते सर्व गाळे पाडून 5 कोटी रुपये खर्च करून तीन मजली 60 गाळे बांधण्याचा निर्णय अर्चनाताई पाटील यांनी जाहीर केला. पुढील काही दिवसातच याचे बांधकाम सुरू करण्याच्या सूचना त्यांनी बांधकाम विभागाला दिल्या

### कांचनमाला संगवे यांनी सभागृह घेतले डोक्यावर

शिराढोण येथील जिल्हा परिषद शाळा आणि कन्या शाळा यांचे नियम डावलून संलग्नीकरण केल्याबद्दल कांचनमाला संगवे यांनी प्राथमिक शिक्षणाधिकारी रवींद्र खंदारे यांना धारेवर धरले. शासकीय नियमानुसार दोन शाळा जर एकाच कंपाऊंड मध्ये असतील तरच त्यांचे संलग्निकरण करावे असे आदेश असताना नियम डावलून संलग्नीकरण केल्याबद्दल संगवे यांनी जोरदार राडा केला. अखेर अर्चनाताई पाटील यांनी मध्यस्ती करत वातावरण शांत केले.

### जिल्ह्यात 110 अभ्यासिका सुरू होणार

धाराशिव जिल्ह्यात 110 गावांमध्ये अभ्यासिका सुरू करण्यात येणार आहेत. त्यासाठी प्रत्येकी 20 लाख रुपये खर्च येणार आहे. यामधे 15 लाखांची इमारत, अडीच लाखांचे फर्निचर आणि दोन लाखांची पुस्तके असणार आहेत.

### नाहीतर अधिकाऱ्यांचा एक महिन्याचा पगार कपात करण्याचा ठराव घेऊ

जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागा कुठे आहेत, किती आहेत, कोणाच्या नावावर आहेत, त्या जागांवर कुणी अतिक्रमण केले आहे याची सर्व माहिती अधिकाऱ्यांनी लवकरात काढावी आणि सभागृहाला द्यावी. सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी याबाबत जबाबदारीने काम करावे अन्यथा अधिकाऱ्यांचा एक महिन्याचा पगार कपात करण्याचा ठराव सभागृहात घ्यावा लागेल असा इशारा अर्चनाताई पाटील यांनी दिला.

### नळाला पाणी आल्यावरच जलजीवनचे बील काढा

जलजीवन मिशनच्या कामावरून सभागृहात जोरदार चर्चा झाली. सत्ताधारी आणि विरोधी अशा दोन्ही बाजूंच्या सदस्यांनी जलजीवनच्या कामावर नाराजी व्यक्त केली. यावर अर्चनाताई पाटील यांनी हस्तक्षेप करत जोपर्यंत जलजीवन मिशनचे पाणी नळाला येणार नाही, तोपर्यंत गुत्तेदारांना एकही रुपयाचे बिल द्यायचे नाही असा ठराव घेतला. काम पूर्ण झाले असेल तर ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद तिन्ही पातळीवर झालेल्या कामाची पाहणी करूनच बिले काढावी असे निर्देश दिले.

### शाळांमधील स्वच्छतागृहांकडे विशेष लक्ष

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुलींसाठी सुलभ स्वच्छतागृह उभारण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करण्याचे सभेत ठरले. बऱ्याच जिल्हा परिषद शाळांमध्ये स्वच्छतागृह नसल्याचे समोर आले. त्यामुळे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी याकडे लक्ष देऊन काम करावे अशा सूचना अध्यक्षांनी दिल्या. तसेच जिल्ह्यातील सर्व खाजगी शाळांची तपासणी करून किती खाजगी शाळांना चांगले स्वच्छतागृह उपलब्ध आहेत याची माहिती प्रत्यक्ष भेट देऊन गोळा करावी असे निर्देश दिले.

### 15 जूनला केंद्रीय विद्यालय सुरू करण्याचे प्रयत्न

येत्या शैक्षणिक वर्षापासून म्हणजे 15 जूनला धाराशिव शहरात केंद्रीय विद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी बैठकीत ठराव घेण्यात आला. यासाठी आयुर्वेदिक कॉलेजची 5 एकर आणि डाएटची 5 एकर अशी 10 एकर जागा उपलब्ध असून त्याठिकाणी पहिली ते बारावीपर्यंत केंद्रीय विद्यालय सुरू करण्यात येणार आहे.

# पेपरफुटी प्रकरणामुळे नीट परीक्षा रद्द

## धाराशिवमधील दोन हजार विद्यार्थ्यांना धक्का

आरंभ मराठी । धाराशिव

नीट पेपरफुटी प्रकरणाला नवे वळण मिळाले असून एनटीएकडून परीक्षा रद्द करून फेरपरीक्षा घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या निर्णयामुळे देशातील २३ लाख विद्यार्थ्यांना मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रीय परीक्षा संस्था म्हणजेच National Testing Agency (NTA) ने एक पत्रक काढून यासंदर्भात माहिती दिली आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. तपास यंत्रणांकडून या प्रकरणात अनेक धक्कादायक खुलासे होत असल्याचा दावा करण्यात येत आहे. तपासादरम्यान असे समोर आले आहे की, नीट परीक्षेच्या तब्बल १५ दिवसांपासून ते एक महिना आधीच विद्यार्थ्यांमध्ये एक तथाकथित 'गेस पेपर' किंवा प्रश्नसंच मोठ्या प्रमाणावर फिरत होता. या प्रश्नसंचामध्ये जवळपास १५० पाने आणि सुमारे ४१० प्रश्नांचा समावेश होता. विशेष म्हणजे, या ४१० प्रश्नांपैकी तब्बल १२० प्रश्न हे रसायनशास्त्र (Chemistry) विषयातील मूळ परीक्षेतील प्रश्नांशी अक्षरशः जुळल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे पेपरफुटीचा संशय अधिकच गडद झाला आहे. काही वृत्तसंस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, नीट यूजी परीक्षेतील ७२० गुणांपैकी सुमारे ६०० गुणांचे प्रश्न काही विद्यार्थ्यांना परीक्षा होण्याच्या दोन दिवस आधीच उपलब्ध झाले होते. या प्रकारामुळे परीक्षा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. तपास यंत्रणा सध्या या कथित 'गेस पेपर'च्या माध्यमातून कोणती फसवणूक, गैरप्रकार किंवा गुन्हेगारी स्वरूपाची कृती झाली का, याचा सखोल तपास करत आहेत. या प्रकरणात विविध राज्यांतील संशयितांची चौकशी सुरू असून अनेक डिजिटल पुरावेही तपासले जात असल्याची माहिती समोर येत आहे. ३ मे रोजी धाराशिव शहरातील पाच परीक्षा केंद्रांवर जवळपास दोन हजार विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा दिली होती. अनेक विद्यार्थ्यांनी परीक्षेनंतर आपल्या गुणांचा अंदाज काढून निकालाची प्रतीक्षा सुरू केली होती. मात्र, परीक्षा रद्द करून फेरपरीक्षा घेण्याची शक्यता समोर आल्यानंतर विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनाही मोठा मानसिक धक्का बसला आहे. अनेक विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी फिरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी आरोपीस 20 वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

**धाराशिव :-** अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार करून तिला गरोदर केल्याप्रकरणी आरोपी किरण सुभाष तिबुले (रा. खामसवाडी, ता. कळंब, जि. धाराशिव) यास कळंब येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने २० वर्षे सक्तमजुरी व ५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. मा. आर. के. राजेभोसले, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश-१, कळंब यांनी मंगळवारी (दि.१२ मे २०२६) हा निकाल दिला. या प्रकरणाबाबत अतिरिक्त शासकीय अभियोक्ता ॲड. अशिष कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीने दिलेल्या फिर्यादीत आरोपी किरण तिबुले याने मागील सहा महिन्यांपासून जिवे मारण्याची धमकी देत वेगवेगळ्या ठिकाणी तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. या अत्याचारातून पीडित मुलगी गरोदर राहिल्याचे उघड झाले. या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ७६/२०२३ अन्वये भारतीय दंड विधान कलम ३७६(३), ३७६(२) (एन), ३७६(२) (जे) तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पॉक्सो) कायद्यातील कलम ४, ६, ८ आणि १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास अधिकारी गंगाधर पुजेरवाड यांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या खटल्याची सुनावणी कळंब न्यायालयात झाली. सरकार पक्षातर्फे एकूण १० साक्षीदार तपासण्यात आले. सुनावणीदरम्यान पीडित मुलीची साक्ष, वैद्यकीय अधिकाऱ्यांचा अहवाल, डीएनए तपासणी अहवाल तसेच इतर साक्षीदारांचे पुरावे न्यायालयात महत्त्वपूर्ण ठरले.

# कळंब पोलिस ठाण्यातील दोन लाचखोर अंमलदारांवर कारवाई

## स्पा सेंटर सुरू ठेवण्यासाठी मागितली होती ४० हजारांची लाच

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यातील कळंब पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या दोन पोलिस अंमलदारांविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) धडक कारवाई करत एका पोलिस कर्मचाऱ्याला ३६ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. ही कारवाई सोमवारी (दि.११ मे) कळंब शहरातील होळकर चौकातून तांदुळवाडी मार्गावर असलेल्या गुलमोहर बिर्याणी हाऊससमोर करण्यात आली. याप्रकरणी अशोक दादाराव करवर (वय ३४, पोलिस अंमलदार, बक्कल नं. ४१७, पोलीस स्टेशन कळंब) याला ताब्यात घेण्यात आले असून दुसरा आरोपी सिद्धेश्वर प्रकाश शिंदे (वय ३७, पोलिस अंमलदार, बक्कल नं. १३८९) याचा शोध सुरू आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराचा कळंब येथे रिलॅक्स स्पा सेंटरचा व्यवसाय आहे. हा व्यवसाय सुरळीत सुरू ठेवण्यासाठी आरोपी पोलिस अंमलदार सिद्धेश्वर शिंदे यांनी पोलिस निरीक्षकांसाठी २० हजार रुपये, तर अशोक करवर यांनी दुय्यम अधिकाऱ्यासाठी २० हजार रुपये अशा एकूण ४० हजार रुपयांच्या हप्त्याची मागणी केली होती.तक्रारदाराने वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली असता, अधिकाऱ्यांना भेटलात तर तुमचा स्पा व्यवसाय बंद करून कारवाई केली जाईल, अशी धमकी देत दोन्ही आरोपींनी जे काही बोलायचे असेल ते आमच्याशीच बोला, असे सांगितल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याबाबत तक्रारदाराने १० मे रोजी जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर करण्यात आलेल्या पडताळणीत दोन्ही आरोपींनी पंचासमक्ष ३६ हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार एसीबीने सापळा रचला. दि.११ मे रोजी तक्रारदाराकडून ३६ हजार रुपयांची लाच स्वीकारताना अशोक करवर याला तक्रारदाराच्या स्विफ्ट कारमध्ये रंगेहात पकडण्यात आले. त्याच्या अंगझडतीत ३६ हजार रुपयांची लाचेची रक्कम, ३५० रुपये रोख, एक मोबाईल, कार व मोटारसायकलच्या चाव्या जप्त करण्यात आल्या आहेत. मोबाईल जप्तीची प्रक्रिया सुरू असून दोन्ही आरोपींच्या घरझडतीची कारवाईही सुरू असल्याची माहिती एसीबीने दिली. या प्रकरणी कळंब पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपी अशोक करवर याला गुन्हा नोंद झाल्यानंतर अटक करण्यात येणार आहे. ही कारवाई बाळू संपती जाधवर, पोलिस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. तपास पोलिस निरीक्षक विजय वगरे हे करत आहेत. या कारवाईस पोहेकॉ गजानन घायवट, पोलिस अंमलदार मनोहर भुतेकर, गणेश चेके, संदीपान लहाने, गजानन कांबळे व चालक भालचंद्र बिनोरकर यांनी सहकार्य केले.

आरंभ मराठी

## दर्शनासाठी लांबच लांब रांगा; सावली व्यवस्थेमुळे भाविकांत समाधान

# उन्हाळी सुट्ट्या व लग्नसराईमुळे तुळजाभवानी मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी

सूरज बागल । आरंभ मराठी



**तुळजापूर** –सध्या सुरू असलेल्या लग्नसराई तसेच उन्हाळी सुट्ट्यांमुळे तुळजापूर येथे भाविकांच्या संख्येमध्ये मोठी वाढ झाली असून मंगळवारी मोठ्या संख्येने भाविक तुळजाभवानी मंदिर येथे तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी दाखल झाले होते. सकाळपासूनच मंदिर परिसर, दर्शन मंडप तसेच प्रमुख रस्त्यांवर भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळत होती. दर्शन मंडपाचे चारही मजले भाविकांच्या गर्दीने अक्षरशः फुलून गेले होते. सध्या राज्यात उन्हाची तीव्रता वाढत असली तरी उन्हाळी सुट्ट्या आणि लग्नसराईचा हंगाम सुरू असल्यामुळे भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा आणि इतर राज्यांमधूनही भाविक मोठ्या प्रमाणात तुळजापुरात दाखल होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे शहरातील धार्मिक वातावरण अधिकच गजबजले आहे. भाविकांच्या सोयीसाठी मंदिर संस्थानच्या वतीने भवानी रोड तसेच महाद्वार रोडवर मोठे मंडप उभारून सावलीची व्यवस्था करण्यात आली आहे. उन्हाच्या तीव्र झळांपासून संरक्षण मिळत असल्याने भाविकांकडून या व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त करण्यात येत आहे. मंदिर परिसरातही विविध ठिकाणी सावलीची सुविधा करण्यात आल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांना मोठा दिलासा मिळत आहे.

गेल्या काही दिवसांत प्रशासन आणि नगरपालिकेकडून राबविण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेचा परिणामही आता दिसून येत आहे. मंदिर परिसरातील अनेक रस्ते आणि मार्ग मोकळे झाल्याने भाविकांचा वावर तुलनेने सुलभ झाला आहे. गर्दी असूनही मंदिर परिसरात हालचालीसाठी जागा उपलब्ध होत असल्याने भाविकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

### जूनच्या मध्यापर्यंत गर्दी कायम राहण्याची शक्यता

सध्या उन्हाळी सुट्ट्या सुरू असल्याने दररोज मोठ्या संख्येने भाविक तुळजापूर येथे येत आहेत. येत्या १५ जूनपर्यंत शाळांना सुट्ट्या असल्याने पुढील एक महिना तरी ही गर्दी कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शनिवार, रविवार तसेच मंगळवार आणि शुक्रवार या दिवशी भाविकांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता प्रशासनाकडून वर्तविण्यात येत आहे.

### वाहतूक व्यवस्थेवर वाढता ताण


भाविकांची वाहने मोठ्या संख्येने शहरात दाखल होत असल्याने शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. शहरातील बहुतांश पार्किंग मैदाने वाहनांनी भरून गेल्याने अनेक भाविकांनी रस्त्यांच्या कडेला वाहने उभी केल्याचे दिसून आले. त्यामुळे काही भागांत वाहतुकीचा वेग मंदावला होता. अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर शहर काही प्रमाणात मोकळे झाले असले तरी वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्थेला अधिक शिस्त लावण्याची गरज व्यक्त होत आहे. पार्किंग व्यवस्थेचे नियोजन, नो-पार्किंग झोनची अंमलबजावणी तसेच वाहतूक नियंत्रणासाठी अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्याची मागणी भाविक आणि स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

CMYK

# सूर्यनारायण कोपला, काळजी घ्या...

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५






राज्यात सूर्य नारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. सध्या राज्यात प्रचंड उकाडा जाणवत असुन जवळपास सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या पुढे गेले आहे. मागील आठवड्यापासून तर राज्यात प्रचंड उकाडा जाणवत आहे. विदर्भ, मराठवाड्यासह संपूर्ण राज्य उकाड्याने हैराण झाले आहे. या महिन्याअखेर राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल असा अंदाज आहे. यावर्षी उन्हाळा कडक असेल असा इशारा हवामान तज्ज्ञांनी दिला होता तो खरा ठरताना दिसत आहे. मागील महिन्यात म्हणजे एप्रिल महिन्यातच याची चाहूल लागली होती गेल्या महिन्यातही सर्वच शहरांचे तापमान वाढले होते. मे महिन्यात तर तापमान उच्चांक गाठत आहे म्हणूनच मे महिना जनतेसाठी जिकारीचा ठरत आहे. या महिन्यात कमाल तापमानाने उच्चांक गाठला आहे. विदर्भात तर उष्णतेची लाट आली आहे. विदर्भातील काही शहरांचे तापमान ४५ अंशाच्या पुढे गेले आहे. पारा ४५ अंशाच्या घरात गेल्याने नागरिकांची अक्षरशः होरपळ होत आहे. विदर्भासह राज्यातील काही भागात उष्णतेच्या प्रचंड लाटा वाहत आहेत. कोरडे व उष्ण वारे आणि वातावरणातील आर्द्रतेचे घटलेले प्रमाण यामुळे या उष्णतेच्या लाटा आल्याचे तज्ज्ञ सांगत आहेत. तापमानाचा पारा वाढत असल्याने उन्हाचा त्रास होऊन उष्माघाताचे प्रमाण वाढले आहे. राज्यात उष्माघाताने काहींचा बळीही गेला आहे. सध्या राज्यात उष्माघाताचे १६४ रुग्णांची नोंद झाली आहे. अर्थात ही संख्या फक्त सरकारी दप्तरी नोंद झालेल्या रुग्णांची आहे. नोंद न झालेले शेकडो उष्माघाताचे रुग्ण राज्यात आहेत. राज्यातील वाढते तापमान आणि वाढते उष्माघाताचे रुग्ण पाहता सरकारने नागरिकांना घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे तो योग्यही आहे असे असले तरी आवश्यक कामासाठी, लग्न, देवधर्म कार्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. ग्रामीण भागात कुलदैवतांच्या यात्रा सुरू झाल्यात. कंदुरीचे कार्यक्रम ठिकठिकाणी सुरू आहेत. सण समारंभ साजरे करण्यासाठी, ग्राम दैवतांचे दर्शन घेण्यासाठी, नातेवाईकांच्या भेटीगाठी घेण्यासाठी लोकांची धावपळ सुरू आहे त्यामुळे उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागत आहे. उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिमाण माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. उन्हाळ्यात मधुमेहासारख्या व्याधी असणाऱ्या व्यक्तींनी विशेष खबरदारी घ्यायला हवी. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळेत उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता देखील असते. उष्माघातापासून वाचण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावेच. दुपारी बारा ते चार यावेळेत घराबाहेर पडूच नये. काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना, टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कापडे परिधान करावेत. उन्हात काम करत असलेल्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा. तापमान वाढले की शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे डिहायड्रेशन होते. डिहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते त्यामुळे चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये म्हणून सतत पाणी पित रहावे. शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते. घराच्या बाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत घ्यायला विसरू नका. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, भाज्या व फळांचे रस दररोज प्याले तरी हरकत नाही. उन्हाळ्यात आरोग्य बिघडतेच म्हणून प्रत्येकाने उन्हाळ्यात आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. खबरदारी घेऊनच आपण उन्हाच्या तीव्रतेपासून बचाव करू शकतो.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ अडचणीत

### निधीअभावी योजना ठप्प, लाभार्थ्यांमध्ये नाराजी

बालाजी मुळे । आरंभ मराठी

**मुरूड-** महाराष्ट्रातील मराठा समाजातील बेरोजगार तरुणांना उद्योग-व्यवसायासाठी प्रोत्साहन देऊन रोजगारनिर्मिती करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेले अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ सध्या गंभीर अडचणीत सापडल्याचे चित्र आहे. निधीअभावी योजना ठप्प झाल्याची तक्रार लाभार्थ्यांकडून होत असून, राज्य शासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कार्यकाळात बंद पडलेले हे महामंडळ पुन्हा सुरू करून त्याला निधी उपलब्ध करून दिला होता. मात्र सध्या हेच महामंडळ आर्थिक अडचणींमुळे अडखळत असल्याची भावना समाजात व्यक्त होत आहे. त्यामुळे राज्य नेतृत्वाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे. दरम्यान, महामंडळाचे अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक यांच्यातील वाद विकोपाला गेल्याची चर्चा आहे. अध्यक्षांनी अनेकदा या संदर्भात शासनाकडे तक्रारी केल्याचे सांगितले जात असले, तरी त्यावर ठोस कार्यवाही झालेली नाही. तसेच मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या विषयावर स्पष्ट भूमिका न घेतल्याने समाजात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. लाभार्थ्यांच्या मते, ऑक्टोबर 2025 पासून महामंडळामार्फत दिला जाणारा व्याज परतावा बंद आहे. त्यामुळे कर्ज घेतलेल्या तरुणांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. महामंडळाच्या कामकाजाबाबतही अनेक तक्रारी पुढे येत आहेत. राज्य शासनामार्फत स्थापन करण्यात आलेली इतर महामंडळे सुरळीतपणे सुरू असताना, अण्णासाहेब पाटील महामंडळ मात्र निधीअभावी ठप्प झाल्याचे दिसून येते.

**महामंडळाच्या अटीही पूर्वीपेक्षा अधिक कडक झाल्याचे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे. त्यामध्ये**

**1) प्रस्तावांना पूर्वीप्रमाणे तात्काळ मंजुरी मिळत नाही**
**2) कर्ज मंजुरीसाठी सहा लाख रुपयाची उत्पन्न मर्यादा अट**
**3) ट्रॅक्टर व इतर व्यावसायिक वाहनांच्या कर्ज मंजुरीवर मर्यादा**
**4) त्रुटी आढळलेल्या अर्जांवर कार्यवाही न करता ते दीर्घकाळ प्रलंबित ठेवणे**
**5) अर्ज 'होल्ड' स्थितीत ठेवून महिनोन् महिने विलंब**
**6) जुने अर्ज थातूरमातूर कारण दाखवून ब्लॉक करणे यामुळे कर्ज घेतलेल्या तरुणांमध्ये असंतोष वाढत आहे. या पार्श्वभूमीवर धाराशिवचे आमदार कैलास पाटील यांनी विधिमंडळात हा मुद्दा उपस्थित केला होता. मात्र त्यानंतरही परिस्थितीत विशेष सुधारणा झालेली दिसून येत नाही. महामंडळाच्या अध्यक्षांनी या प्रकरणामागील कारणांची चौकशी करण्याची मागणी केली असून शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. दरम्यान, मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील यांनीही या प्रश्नावर लवकरच आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.**

### बॉक्स: वेब पोर्टलवरील बदलांमुळे चर्चेला उधाण

आश्चर्याची बाब म्हणजे, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या अधिकृत वेब पोर्टलवरून महामंडळाचे अध्यक्ष तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे फोटो काढून टाकण्यात आल्याचे दिसून येत आहे. सध्या पोर्टलवर केवळ मुख्यमंत्री आणि राज्यपाल यांचेच फोटो ठेवण्यात आले आहेत. सामान्यतः शासनाच्या विविध पोर्टलवर राज्यपाल, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांचे फोटो असतात. मात्र या विशिष्ट पोर्टलवरून उपमुख्यमंत्र्यांचे तसेच मंडळाच्या अध्यक्षांचे फोटो का हटवण्यात आले, याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने समाजात विविध चर्चांना उधाण आले आहे. यामागील कारण अद्याप अनुत्तरित असल्याने प्रशासनाने याबाबत स्पष्टीकरण देण्याची मागणी होत आहे.

## सासूकडून 20 लाख रुपये आणण्याचा तगादा; युवकाचे अपहरण करून मारहाण

आरंभ मराठी । कळंब

कळंब शहरातील साठे चौक परिसरातून एका युवकाचे जबरदस्तीने अपहरण करून त्याला ढोकी येथे नेऊन बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गुड्डुया उर्फ प्रकाश शहाजी काळे, आबा आप्पा शिंदे (दोघे रा. मोहा) तसेच सुनिल उजना चव्हाण (रा. ढोकी, ता. जि. धाराशिव) यांनी दि. १० मे २०२६ रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास साठे चौक येथील जुन्या दूध डेअरीजवळील परिसरातून फिर्यादी संतोष बब्रुवान काळे (वय ३७, रा. साठे चौक, कळंब) यांना जबरदस्तीने काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीत बसवले. यानंतर आरोपींनी त्यांना ढोकी येथील सुनिल चव्हाण यांच्या शेड फार्मवर नेले. तेथे "तुझ्या सासूकडून २० लाख रुपये आण" असा तगादा लावण्यात आला. फिर्यादीने पैसे आणण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच लोखंडी टॉमी व चाकूने हल्ला करून जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. "पैसे दिले नाहीत तर जिवे मारून टाकू," अशी धमकीही आरोपींनी दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी संतोष काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १४०(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(३), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## रंगावरून टोमणे. छळ अन् मारहाण

### विवाहितेच्या आत्महत्येनंतर पतीसह चौघांवर गुन्हा

आरंभ मराठी । नळदुर्ग

तुळजापूर तालुक्यातील येडोळा येथे विवाहित महिलेच्या आत्महत्येप्रकरणी पतीसह चौघांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा नळदुर्ग पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. सततचा मानसिक व शारीरिक छळ, शिवीगाळ आणि रंगावरून टोमणे मारल्यामुळे संबंधित महिलेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मयत आशा आकाश शेगर (वय 24, रा. येडोळा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी दि. 10 मे 2026 रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी विषारी औषध सेवन करून आत्महत्या केली. या घटनेनंतर नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आकाश दत्ता शेगर, चांगुणाबाई दत्ता शेगर, भाग्यश्री दिलीप चव्हाण आणि तात्याराव राजाराम चव्हाण (सर्व रा. येडोळा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी दत्ता देवराव चव्हाण (वय 52, रा. येडोळा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी हे मार्च 2022 पासून आशा शेगर यांना "तू काळी आहेस, तू आम्हाला आवडत नाहीस, तू तुझ्या माहेरी जा, आम्हाला तुला नांदवायचे नाही," असे म्हणत वारंवार शिवीगाळ करत होते. तसेच त्यांना मारहाण करून मानसिक व शारीरिक त्रास दिला जात होता. या सततच्या छळाला कंटाळून आशा यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (भा.न्या.सं.) कलम 80, 85, 108 आणि 3(5) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## रिव्हॉल्वरचा धाक दाखवत दहशत माजवणाऱ्यावर वाशी पोलिसांत गुन्हा

आरंभ मराठी । वाशी

पार्डी फाटा येथे रिव्हॉल्वरचा धाक दाखवून नागरिकांना घाबरवून शांततेचा भंग करणाऱ्या एका व्यक्तीविरोधात वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सचिन पांडुरंग आठरे (रा. प्लॉट नं. सी-103, अध्या संकल्प सोसायटी, गायकवाड नगर, दिघी हवेली, जि. पुणे) याने दि. 10 मे 2026 रोजी रात्री 10.15 ते 10.30 वाजण्याच्या सुमारास पार्डी फाटा येथील कैलास भोसले यांच्या हॉटेलसमोर दारूच्या नशेत गोंधळ घातला. यावेळी आरोपीने त्याच्याकडील रिव्हॉल्वरचा धाक दाखवत फिर्यादी सिद्धार्थ मच्छिंद्रनाथ मोरे (वय 21, रा. पार्डी ता. वाशी, जि. धाराशिव) तसेच परिसरातील इतर नागरिकांना घाबरवून दहशत निर्माण केली. त्यामुळे परिसरातील शांतता भंग झाल्याची तक्रार फिर्यादीने वाशी पोलिसांकडे दिली. सदर प्रकरणी सिद्धार्थ मोरे यांनी दिलेल्या प्रथम खबरवरून वाशी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 351(2), 125 तसेच आर्म ॲक्ट कलम 30 आणि महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम 85(1) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वाशी पोलीस करत आहेत.

## वारंवार वीज खंडित होत असल्याने मेंढा गावातील नागरिक व शेतकरी त्रस्त

आरंभ मराठी । तेर



धाराशिव तालुक्यातील मेंढा गावाला पाडोळी सबस्टेशनमधून विद्युत पुरवठा केला जातो. मात्र गेल्या दोन महिन्यांपासून गावातील वीजपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला असून, दररोज तब्बल ८ ते ९ तास वीज खंडित होत असल्याने नागरिकांसह शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. सततच्या वीज खंडितामुळे शेतकऱ्यांना पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे. उष्णतेच्या वाढत्या तीव्रतेमुळे पालेभाज्या तसेच ऊस पिकांवर परिणाम होत असून, पिके करपण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वीज नेमकी कधी येईल याचा काहीच ठावठिकाणा नसल्याने शेतीचे नियोजनच कोलमडले आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे. वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने लहान मुले, वृद्ध नागरिक यांना उष्णतेचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच सततच्या ट्रिपिंगमुळे विजेवर चालणारी अनेक उपकरणे जळत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. घुगी व पाडोळी या गावांमध्ये वीजपुरवठा सुरळीत सुरू असताना केवळ मेंढा गावातच वारंवार वीज खंडित का होते, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. यामागील कारण स्पष्ट करण्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, पुढील दोन दिवसांत वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास महावितरण कार्यालयावर मोर्चा काढण्याची तयारी तरुण वर्गातून सुरू असल्याची माहिती मिळत आहे. मेंढा गावातील नागरिकांनी महावितरण प्रशासनाने तातडीने दखल घेऊन नियमित व सुरळीत वीजपुरवठा करावा, अशी जोरदार मागणी केली आहे.

## 99.20 टक्के गुणांसह श्रेया सिरसाठचे इयत्ता दहावीच्या परीक्षेत यश



आरंभ मराठी । पळसप

पळसप (ता. धाराशिव) येथील कु. श्रेया तानाजी सिरसाठ हिने एसएससी बोर्ड परीक्षेत तब्बल ९९.२० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या उज्ज्वल कामगिरीमुळे कुटुंबासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र तिचे कौतुक होत आहे. श्रेया ही मुरुड येथील जनता विद्या मंदिर या शाळेची विद्यार्थिनी असून तिने परिश्रम, चिकाटी आणि सातत्याच्या जोरावर हे यश मिळवले आहे. नियमित अभ्यास, शिस्तबद्ध दिनचर्या आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाल्याचे श्रेयाने सांगितले. तिच्या या यशाबद्दल पालक, शिक्षक, नातेवाईक तसेच ग्रामस्थांनी अभिनंदनाचा वर्षाव केला. यानिमित्त शाळेकडून तसेच नातेवाईकांकडून श्रेयाचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थित शिक्षक व कुटुंबीयांनी तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत, भविष्यात ती आणखी

## हनुमान विद्यालयाचे दहावी निकालात घवघवीत यश

### 94.89 टक्के निकाल, सेमी इंग्लिश शाखेचा 100 टक्के निकाल

**शिराढोण :-** कळंब तालुक्यातील घारगाव येथील ज्ञानसागर एज्युकेशन सोसायटी, लातूर संचलित हनुमान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने मार्च 2026 च्या इयत्ता दहावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल 94.89 टक्के लागला असून सेमी इंग्लिश माध्यमाने शंभर टक्के निकालाची उत्कृष्ट कामगिरी केली आहे. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत शाळेचा नावलौकिक वाढवला. वैष्णवी सतीश जाधव हिने 91.40 टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कोमल बालाजी ठोंबरे हिने 91.20 टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक, तर श्रीकांत नारायण गुंडरे याने 89.40 टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.याशिवाय श्रेया पांडुरंग साळुंके (85.60%), सृष्टी हनुमंत कमळे (85%), समीक्षा शामसुंदर वाघमोडे (84%), समृद्धी महेश लोमटे (83.40%), शिवम संजय चापाकानडे (82.80%), प्रतीक्षा गोविंद शिंदे (82.60%), आस्था अरुण शिंदे (82.40%), महेक फरीद सय्यद (82%), रुक्सार नजीम पठाण (81.80%), अक्षता हनुमंत कांबळे (81.60%), सुहाना अब्दुलकदीर सय्यद (81.40%), गौरी महेंद्र मैंदाड (80.20%) आणि पूजा श्रीकृष्ण घाटोळे (80.20%) यांनीही विशेष यश संपादन केले.एकूण 24 विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह परीक्षा उत्तीर्ण केली असून 40 विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर 29 विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी प्राप्त केली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचा शिक्षक व पालकांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या यशाबद्दल संस्थेचे सर्वेसर्वा जावेद शेख, अध्यक्ष मतीन पटेल, सचिव मुजाहेद शेख, मुख्याध्यापक तथा प्राचार्य अरुण जाधवर आणि पर्यवेक्षक एम. ए. शेख यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कुलशेजारी, वाघोली,पुणे.

## विविध वृत्त

### ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



**आरंभ मराठी । धाराशिव**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेत धाराशिव तालुक्यातील भाई उद्धवराव पाटील हायस्कूल, तुगाव येथील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सचिन लोमटे यांच्या वतीने सत्कार करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या परीक्षेत कु. क्रांती भुतेकर हिने 95.60% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर कु. श्रेयस गडकर यानेे 94.60% गुण मिळवून उज्ज्वल यश मिळवले. दोन्ही विद्यार्थ्यांनी शेतकरी कुटुंबातून कठोर परिश्रम व चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले.या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करताना पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या या कामगिरीमुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे.

### मुरुम येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेचा शंभर टक्के निकाल



**आरंभ मराठी । मुरूम**

उमरगा तालुक्यातील आठ जिल्हा परिषद हायस्कूलपैकी केवळ जि.प. कन्या प्रशाला, मुरूम या शाळेने यंदाच्या दहावी परीक्षेत १०० टक्के निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखत तालुक्यात मानाचा तुरा रोवला आहे. सन २०२५-२६ च्या दहावी परीक्षेत शाळेतील सर्व ३५ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून, त्यापैकी तब्बल ३१ विद्यार्थिनींनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. तसेच उर्वरित ४ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींनी मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे. या परीक्षेत वर्षा अंबुसे हिने ९७.८० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. नंदिनी जाधव हिने ९६.४० टक्के गुणांसह द्वितीय, तर राधिका घोडके हिने ९२.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. याशिवाय आरती मंडले, निकिता पुराणे, नंदिनी भोसले, शुभांगी एकुरगे, अंजली मंडले व अनुष्का लोखंडे यांनीही ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत शाळेच्या यशात भर घातली. विद्यार्थिनींच्या या उज्ज्वल यशामागे मुख्याध्यापक हरी शेक यांच्यासह बालाजी गायकवाड, सुनिता खंडागळे, रेणुका कुलकर्णी, अनिल वाघमारे व सोनाली कलशेट्टी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पालक, ग्रामस्थ तसेच शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाचा 96 टक्के निकाल; सृष्टी पाटील प्रथम

**आरंभ मराठी । शिराढोण**

कळंब तालुक्यातील शिराढोण येथील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाने दहावी परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९६ टक्के लागला असून विद्यार्थिनींनी घवघवीत यश मिळवले आहे. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थिनींमध्ये सृष्टी सुनील पाटील हिने ९२.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. अक्षरा धनंजय सावंत हिने ८६.४० टक्के गुणांसह द्वितीय, तर मिस्सबा वाजीद शेख हिने ८५.८० टक्के गुण मिळवत तृतीय स्थान मिळवले. तसेच अक्षरा कुलभूषण पाटवदकर हिने ८५.६० टक्के, मोहिनी दयानंद राऊत हिने ८५.४० टक्के आणि श्रावणी शैलेश मुंदडा हिने ८१.२० टक्के गुण मिळवत विद्यालयाच्या यशात भर घातली. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थिनी, पालक, शिक्षक व मुख्याध्यापक यांचे संस्थेचे सचिव आ. विक्रम काळे तसेच कोषाध्यक्ष प्रा. अनिल काळे यांनी अभिनंदन केले. विद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वाटचालीबद्दल शिराढोण परिसरातून समाधान व्यक्त होत आहे.

### शिराढोण प्रशालेचा इयत्ता दहावीचा निकाल 95 टक्के

**आरंभ मराठी । शिराढोण**

कळंब तालुक्यातील शिराढोण येथील पीएम श्री आदर्श जिल्हा परिषद प्रशालाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या दहावी परीक्षेत ९५ टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. शाळेतील १३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून, १९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या परीक्षेत कु. हर्षदा दिगांबर पांचाळ हिने ९२.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. प्रीती राम दुगाने हिने ८९.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. प्रतीक्षा पंढरी जाधवर हिने ८८.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. दरम्यान, या निकालातील विशेष बाब म्हणजे विद्यार्थी मोहित नाईकवाडे याने सर्व विषयांत ३५ गुण मिळवत ३५ टक्क्यांनी उत्तीर्ण होण्याची किमया साधली. अत्यंत संघर्षपूर्ण परिस्थितीतही खचून न जाता त्याने मिळवलेले हे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. केवळ गुणवत्ता यादीत स्थान मिळवणेच यश नसते, तर प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत शिक्षणाची वाट कायम ठेवणेही मोठे यश असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापक सुनील अहिरे, अर्जुन जाधव, शिवलाल इनामदार, दत्तात्रय राठोड तसेच प्रशालेतील सर्व शिक्षकांचे शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

### 100 टक्के अनुदानावर वैरण बियाणे वाटप; पशुपालकांना अर्ज करण्याचे आवाहन

धाराशिव :- पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद धाराशिव यांच्या वतीने सन २०२६ - २७ या आर्थिक वर्षात पशुपालकांसाठी विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून, दुभत्या जनावरांना पुरेसे व दर्जेदार खाद्य उपलब्ध व्हावे यासाठी दुभत्या जनावरांना खाद्य उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रम (वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम) अंतर्गत १०० टक्के अनुदानावर वैरण बियाणे वाटप करण्यात येणार आहे. या योजनेसाठी इच्छुक लाभार्थ्यांकडून ३१ मे २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत. पशुपालकांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा उप आयुक्त,पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, धाराशिव यांनी केले आहे. योजनेअंतर्गत दुभत्या जनावरांसाठी हिरव्या चाऱ्याची उपलब्धता वाढविणे,पशुखाद्य विकासाला चालना देणे आणि पशुपालकांचा खर्च कमी करणे हा उद्देश असून, पात्र लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर वैरण बियाण्यांचे वाटप करण्यात येणार आहे. योजनेविषयी अधिक माहितीसाठी पशुपालकांनी आपल्या नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी तसेच पंचायत समिती स्तरावरील पशुधन विकास अधिकारी (विस्तार) कार्यालयाशी संपर्क साधावा. अर्जाचा विहित नमुना,मार्गदर्शक सूचना,नियम,अटी तसेच आवश्यक कागदपत्रांची यादी पशुसंवर्धन विभाग,पंचायत समिती कार्यालय, येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## तामलवाडी - वडगाव (काटी) रस्त्याचे काम तीन महिन्यांपासून ठप्प

# उकरलेल्या रस्त्यामुळे नागरिकांचे हाल

### ७.२० कोटींच्या सिमेंट रस्त्याची दुरवस्था; ठेकेदार गायब, निकृष्ट कामावर ग्रामस्थांचा संताप

**आरंभ मराठी । तामलवाडी**

**तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी ते वडगाव (काटी) या महत्त्वाच्या सात किलोमीटर रस्त्याचे काम गेल्या तीन महिन्यांपासून पूर्णपणे रखडल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या या रस्त्याच्या कामासाठी तब्बल ७ कोटी २० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात कामाची गती अत्यंत संथ असून अनेक ठिकाणी रस्ता उकरून ठेवण्यात आल्याने वाहनधारक, विद्यार्थी, शेतकरी आणि ग्रामस्थांचे हाल होत आहेत.**






मागील वर्षी गाजावाजा करत या सिमेंट रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली होती. सुरुवातीच्या टप्प्यात रस्त्यालगतची झाडेझुडपे हटविण्यात आली तसेच काही ठिकाणी सिमेंटचे पूल बांधण्यात आले. मात्र, नव्याने उभारण्यात आलेल्या पुलांना सुरुवातीलाच तडे गेल्याचे दिसून आल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. नागरिकांनी याबाबत संबंधित विभागाकडे नाराजी व्यक्त केली असून निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करण्याची मागणीही केली आहे. सध्या रस्त्याची परिस्थिती अत्यंत बिकट बनली आहे. अनेक ठिकाणी खोदकाम करून रस्ता अर्धवट अवस्थेत सोडण्यात आला आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांना मोठी कसरत करावी लागत असून लहान-मोठे अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर हा रस्ता अधिक धोकादायक बनण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. रात्रीच्या वेळी रस्त्यावर कोणतीही सुरक्षिततेची व्यवस्था नसल्याने नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. तामलवाडी, वडगाव (काटी) आणि परिसरातील गावांसाठी तुळजापूरला ये-जा करण्यासाठी हा प्रमुख मार्ग मानला जातो. शेतमालाची वाहतूक, विद्यार्थ्यांची शाळा-कॉलेजची ये-जा, तसेच दैनंदिन कामासाठी नागरिकांचा या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वावर असतो. मात्र, काम बंद पडल्यामुळे नागरिकांना पर्यायी रस्त्यांचा वापर करावा लागत असून त्यासाठी अधिक वेळ आणि खर्च सहन करावा लागत आहे.ग्रामस्थांनी संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून रखडलेले काम सुरू करावे, कामाची गुणवत्ता तपासावी आणि निष्काळजीपणा करणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. काम सुरू करून रस्ता व्यवस्थित पूर्ण होणार नसेल तर उकरून ठेवण्याचा अधिकार ठेकेदाराला कोणी दिला? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

#### त्या ठेकेदाराला कोणाचा वरदहस्त ?

संबंधित ठेकेदाराला जिल्ह्यातील एका बड्या नेत्याचा आशीर्वाद असल्याची चर्चा सध्या नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. जिल्ह्यातील अनेक रस्त्यांची कामे याच ठेकेदाराकडे असल्याचे बोलले जात असून त्यामुळेच काम रखडूनही त्याच्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे, या कामाचा ठेका विरोधी पक्षातील खासदार समर्थक असलेल्या तुळजापूरमधील एका स्थानिक ठेकेदार नेत्याकडे देण्यात आल्याचीही चर्चा परिसरात सुरू आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधक दोघेही एकत्रितपणे काम करत असल्याचे चित्र निर्माण झाले असून, “समस्या मांडायची तरी नेमके कोणाकडे?” असा प्रश्न गावकऱ्यांना पडला आहे. काम बंद पडल्याने आणि प्रशासनाकडून हालचाल दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

#### दंडात्मक कारवाई करण्यात येईल

आम्ही संबंधित ठेकेदाराला काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अन्यथा त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**संजय विभुते**
शाखा अभियंता, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना.

## जिल्हा परिषद शाळांमधून घडत आहेत गुणवंत विद्यार्थी : उपसभापती प्रमोद पाटील

### वडगाव (सि.) जि.प. प्रशालेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात

**आरंभ मराठी । धाराशिव**

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत असल्यामुळेच आजच्या स्पर्धात्मक युगातही जि.प. शाळांतील विद्यार्थी आपला ठसा उमटवत आहेत, असे प्रतिपादन धाराशिव पंचायत समितीचे उपसभापती प्रमोद पाटील यांनी केले. तालुक्यातील वडगाव (सि.) येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या दहावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. पंचायत समिती सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीच्या सभापती गोकर्णाताई कदम या होत्या. यावेळी पंचायत समिती सदस्य प्रशांत रणदिवे, सचिन सरवदे, गोपाळ कदम, मुख्याध्यापिका ज्योती राऊत, केंद्रप्रमुख भालचंद्र कोकाटे, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी बापू शिंदे, शिक्षिका सरोजा पाटील यांच्यासह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपसभापती प्रमोद पाटील म्हणाले की, शासनाने



जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती करावी, यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील असून जिल्हा परिषद शाळा अधिक सक्षम आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी आपणही प्रयत्न करणार आहोत. कार्यक्रमाच्या अध्यक्षा गोकर्णाताई कदम यांनी शाळेचा दहावीचा शंभर टक्के निकाल लागल्याबद्दल विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रशालेतील प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली कु. सुषमा मोरे, द्वितीय क्रमांकाची कु. दिव्या पाटील, तृतीय क्रमांकाची कु. अंतरा वाडकर यांच्यासह विशेष प्राविण्य मिळवलेल्या १२ विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ, पेन व गौरवपत्र देऊन सभापती गोकर्णाताई कदम व उपसभापती प्रमोद पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका ज्योती राऊत यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन भालचंद्र कोकाटे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काटीचे सुपुत्र यशपाल हंगरगेकर कार्यकारी अभियंतापदी विराजमान



**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील काटी येथील सुपुत्र इंजि. यशपाल अभिमान हंगरगेकर यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेत (BMC) ‘कार्यकारी अभियंता (स्थापत्य) वर्ग-१’ या महत्त्वपूर्ण पदावर पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या यशामुळे धाराशिव जिल्ह्यासह संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यशपाल हंगरगेकर यांचा शैक्षणिक व व्यावसायिक प्रवास ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांनी शिंदे हायस्कूल (तुळजापूर), छत्रपती शिवाजी हायस्कूल (धाराशिव) आणि रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातून शिक्षण घेतले. त्यानंतर शासकीय तंत्रनिकेतन व तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर येथून बी.ई. पदवी पूर्ण केली. पुढे नांदेड येथील एसजीजीएस संस्थेतून एम.टेक. शिक्षण घेत त्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध केली.सन २०११ मध्ये त्यांनी मुंबई महानगरपालिकेत ‘सब इंजिनिअर’ म्हणून सेवेला सुरुवात केली. प्रामाणिकपणा, कामातील तळमळ आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर त्यांनी सहाय्यक अभियंता पदापासून थेट कार्यकारी अभियंता पदापर्यंत मजल मारली आहे. पदभार स्वीकारल्यानंतर धाराशिव येथे आगमन होताच त्यांचा विविध संस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. ९ मे रोजी शिक्षक मित्र परिवारातर्फे, तर १० मे रोजी तुळजाभवानी ज्येष्ठ नागरिक संघाकडून शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रा. काकासाहेब आहेर, मा. शिक्षणाधिकारी शिवाजीराव जाधव, प्रा. डॉ. देविदास इंगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या सत्कार समारंभाला प्राचार्य जी. के. सोन्नेपाटील, विजयकुमार बागल, दिलीप पवार, तानाजी सिनगारे, गोरोबा लोंढे, अशोक चव्हाण, सतीश पवार, दादासाहेब हंगरकर, दयानंद जवळगावकर, अनिल हंगरकर, बापू काळे, सतीश महामुनी, संतोष भालेकर, तुकाराम वडणे, सुनील फंड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## सरपंच पदाच्या आरक्षणाची पुन्हा सोडत निघणार

### बदलणार ओबीसी आणि खुल्या प्रवर्गाच्या जागा

**धाराशिव :-** ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर धाराशिव तालुक्यातील सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीबाबत मोठी घडामोड समोर आली आहे. शासनाच्या दि. ०४ मे २०२६ रोजीच्या शुद्धीपत्रकानुसार नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) आणि खुल्या प्रवर्गातील आरक्षण संख्येमध्ये बदल करण्यात आल्याने धाराशिव तालुक्यातील सरपंच पदाची आरक्षण सोडत पुन्हा नव्याने काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी दि. १० जुलै २०२५ रोजी धाराशिव तालुक्यातील सरपंच पदाची आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली होती. मात्र शासनाने दि. ३० एप्रिल २०२६ रोजी केलेल्या बदलानंतर ओबीसी आणि खुल्या प्रवर्गातील जागांच्या संख्येत फेरबदल करण्यात आला आहे. त्यानुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या आरक्षणात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. फक्त ओबीसीची एक जागा कमी करून खुल्या प्रवर्गात एक जागा वाढविण्यात आली आहे.धाराशिव जिल्ह्यातील एकूण ६२१ ग्रामपंचायतींसाठी यापूर्वी जाहीर करण्यात आलेल्या आरक्षणानुसार सरपंच पदासाठी अनुसूचित जातीसाठी १००, अनुसूचित जमातीसाठी १३, ओबीसीसाठी १६८ आणि खुल्या प्रवर्गासाठी ३४० जागा निश्चित करण्यात आल्या होत्या. नव्या बदलानंतर ओबीसीच्या जागा १६७ वर आल्या असून खुल्या प्रवर्गाच्या जागा ३४१ झाल्या आहेत. जिल्ह्यातील आठ तालुक्यांपैकी धाराशिव तालुक्यात सर्वाधिक ११० ग्रामपंचायती असल्याने या बदलाचा परिणाम धाराशिव तालुक्यावर झाला आहे. नव्या आदेशानुसार ओबीसीची एक जागा कमी होऊन ती संख्या २९ वर आली असून खुल्या प्रवर्गाच्या जागा ५८ झाल्या आहेत. त्यामुळे धाराशिव तालुक्यातील केवळ नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग या दोन गटांसाठी सरपंच पदाची नव्याने आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सोमवार दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, धाराशिव येथे पार पडणार आहे.

**दैनिक आरंभ मराठी** — पाणी आहे, पण वीज नसल्याने शेतकरी हतबल, आंदोलनाचा इशारा

# तेरमध्ये कमी दाबाने वीजपुरवठा; उन्हाळी पिके संकटात

**सुभाष कुलकर्णी । आरंभ मराठी**



**तेर**-महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या ढिसाळ आणि मनमानी कारभारामुळे तेर परिसरातील शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. तेर येथील ३४/११ के.व्ही. सबस्टेशनमधून गेल्या अनेक दिवसांपासून अत्यंत कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने उन्हाळी पिकांचा अक्षरशः धुराळा उडत आहे. शेतात पाणी आहे, पण वीज नाही अशी केविलवाणी अवस्था शेतकऱ्यांची झाली असून पिके डोळ्यांसमोर वाळत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. तेर येथील सबस्टेशनमधून तेर, रामवाडी, पानवाडी, वाघोली, मुळेवाडी आणि पवारवाडी या फिडरवर वीजपुरवठा केला जातो. मात्र सध्या सुरू असलेला कमी दाबाचा वीजपुरवठा नागरिकांसह शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. महावितरणकडून केवळ साडेसहा तास वीजपुरवठा केला जात असून तोही अत्यंत कमी दाबाने होत असल्याने शेतातील विद्युत पंप व्यवस्थित सुरू होत नाहीत. परिणामी पाणी उपलब्ध असूनही पिकांना पाणी देता येत नसल्याने उन्हाळी पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. शेतकऱ्यांनी मोठ्या मेहनतीने आणि खर्च करून पिके उभी केली आहेत. मात्र ऐन हंगामातच वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली आहे. कमी दाबामुळे मोटारी बंद पडणे, पंप न चालणे, तसेच विद्युत उपकरणांचे नुकसान होण्याचे प्रकारही वाढले आहेत. दुसरीकडे गावातील घरगुती वीजपुरवठाही अत्यंत कमी दाबाने होत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. उष्णतेच्या तीव्र लाटेमुळे आधीच नागरिक त्रस्त असताना घरातील फॅन, कुलर यांसारखी उपकरणे नीट चालत नसल्याने नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, महावितरणने तातडीने सुरळीत आणि पुरेशा दाबाने वीजपुरवठा सुरू न केल्यास महावितरण कार्यालयासमोर हलगी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा माजी उपसरपंच बाळासाहेब कदम यांनी दिला आहे. त्यामुळे महावितरण प्रशासन या गंभीर समस्येकडे कितपत गांभीर्याने लक्ष देते, याकडे परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# सोयाबीनचा भाव सात हजारावर; पण शेतकऱ्यांना फायदा नाही

## माल असताना भाव नाही, भाव आला की माल नाही; सोयाबीन तेजीतही शेतकरी मात्र तोट्यातच

अमोलसिंह चंदेल । आरंभ मराठी

**शिराढोण : राज्यात सध्या सोयाबीनच्या बाजारभावाने सात हजार रुपयांचा टप्पा पार केला असून अनेक बाजार समित्यांमध्ये सोयाबीनच्या दरात मोठी तेजी पाहायला मिळत आहे. व्यापारी पेठांमध्ये आणि खाजगी खरेदी केंद्रांवर वाढलेल्या भावाची चर्चा रंगत असली, तरी या दरवाढीने सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या आयुष्यात मात्र कोणताही आनंद निर्माण झालेला दिसत नाही. उलट "आपल्याकडे माल असताना भाव नव्हता आणि आता भाव वाढले तर कोठार रिकामे आहे," अशी वेदना अनेक शेतकरी व्यक्त करत आहेत.**



शेतकरी वर्षभर जीव तोडून मेहनत करतो. उन्हाळा, पाऊस, रोगराई, अवकाळी पाऊस, नैसर्गिक संकटे, वाढते उत्पादन खर्च आणि बाजारातील अनिश्चितता यांचा सामना करत पिक उभे करतो. मात्र उत्पादन हातात आल्यानंतर त्याला योग्य दर मिळेल याची कोणतीही हमी नसते. सोयाबीनचेही यंदा नेमके तेच झाले. उत्पादन हाती आले त्या काळात बाजारात कमी दर असल्याने अनेक शेतकऱ्यांनी चार ते पाच हजार रुपयांच्या दरात आपले सोयाबीन विकून टाकले. कारण त्यांच्या समोर घरखर्च, शेती खर्च, बँकेचे हप्ते, मुलांचे शिक्षण, औषधोपचार, वीजबिल आणि सावकारांचे तगादे असे असंख्य प्रश्न उभे होते. ग्रामीण भागात आज बहुतांश छोटा आणि मध्यम शेतकरी हा कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला आहे. पीककर्ज घेतल्याशिवाय शेती करणे अशक्य झाले आहे. बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, औषधे, मजुरी आणि इंधनाचे दर दिवसेंदिवस वाढत आहेत. अनेक वेळा शेती करण्यासाठी घेतलेले कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याला पिक काढताच माल विकावा लागतो. त्याच्याकडे माल साठवून ठेवण्याची ना आर्थिक ताकद असते, ना पुरेशी गोदाम व्यवस्था. मोठे व्यापारी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम घटक मात्र याच परिस्थितीचा फायदा घेतात. हंगामात कमी दरात मोठ्या प्रमाणावर माल खरेदी करून तो साठवला जातो. काही महिन्यांनंतर बाजारात तुटवडा निर्माण झाला की भाव वाढतात आणि त्यावेळी व्यापारी व साठेबाज मोठा नफा कमावतात. शेतकरी मात्र पुन्हा एकदा रिकाम्या हाताने बाजारातील तेजी पाहत बसतो.

### शेतीत वाढती निराशा

सततची आर्थिक अस्थिरता, नैसर्गिक संकटे आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे ग्रामीण भागात शेती व्यवसायाबद्दल मोठी निराशा वाढताना दिसत आहे. अनेक तरुण शेतीपासून दूर जात आहेत. शेतीत मेहनत जास्त आणि उत्पन्न अनिश्चित असल्याने ग्रामीण भागातील बेरोजगारी आणि स्थलांतराचे प्रमाणही वाढत आहे. आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, शेतकरी पिकवतो, जोखीम घेतो, कर्ज काढतो, नैसर्गिक संकटांशी लढतो; पण नफा मात्र दुसराच कमावतो. त्यामुळे सोयाबीनचा भाव सात हजार पार गेल्याची बातमी बाजारासाठी आनंदाची असली, तरी सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मनात मात्र ती एक वेदनादायी बाब ठरत आहे.

### कांद्यालाही कवडीमोल भाव

सोयाबीनच्या भाववाढीची चर्चा सुरू असतानाच राज्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. अनेक बाजार समित्यांमध्ये कांद्याला अत्यल्प दर मिळत आहेत. काही ठिकाणी उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. एका बाजूला सोयाबीनचे भाव वाढलेले असले तरी शेतकऱ्यांकडे माल नाही, तर दुसऱ्या बाजूला कांदा हातात असूनही त्याला भाव नाही, अशी विरोधाभासी परिस्थिती निर्माण झाली आहे. कांदा पिकासाठी लागणारा खर्च प्रचंड वाढलेला आहे. बियाणे, रोपे, औषधे, फवारणी, मजुरी, वाहतूक या सर्व खर्चामुळे शेतकरी आधीच आर्थिक तणावाखाली आहे. त्यातच बाजारात मिळणारे कमी दर शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत आहेत.

### हमीभावाच्या प्रश्नाकडे दुर्लक्षच

शेतकरी संघटनांकडून वारंवार हमीभावाची मागणी केली जाते. मात्र प्रत्यक्षात बहुतांश शेतमाल बाजाराच्या भरोशावरच विकला जातो. शासनाकडून जाहीर होणारा हमीभाव आणि प्रत्यक्ष बाजारभाव यात मोठी तफावत असते. तसेच खरेदी प्रक्रियेत होणारा विलंब, नोंदणीतील अडचणी आणि मर्यादित खरेदी केंद्रांमुळे शेतकऱ्यांना खुल्या बाजारात कमी दरात माल विकण्याची वेळ येते.शेतीमाल साठवण क्षमता वाढवणे, गावपातळीवर गोदाम व्यवस्था उभारणे, प्रक्रिया उद्योगांना चालना देणे आणि शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा "दरवर्षी भाव वाढला पण शेतकऱ्याकडे मालच नव्हता" ही परिस्थिती कायम राहणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### भाव वाढल्याची बातमी ऐकून मनाला टोचणी

सध्या टीव्ही, मोबाईल किंवा बाजार समित्यांच्या फलकावर सात हजार रुपयांचा भाव पाहिला की शेतकऱ्यांच्या मनात मोठी खंत निर्माण होते. कारण काही महिन्यांपूर्वी त्याच मालाला योग्य दर मिळाला असता तर कर्जाचा काही भार कमी झाला असता. अनेकांचे दागिने गहाण पडलेले असतात, काहींनी खासगी सावकारांकडून व्याजाने पैसे घेतलेले असतात, तर काही शेतकरी अजूनही जुन्या कर्जातून बाहेर पडलेले नसतात. शेतीमालाला योग्य आणि स्थिर दर मिळाला असता तर ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत झाली असती. पण प्रत्यक्षात बाजारातील नफ्याचा मोठा हिस्सा व्यापारी साखळीमध्येच अडकतो. उत्पादन करणारा शेतकरी मात्र कायम आर्थिक विवंचनेत राहतो.

# धाराशिव आगाराचे चालक अमोल गोरे यांची राज्य चिटणीसपदी निवड

आरंभ मराठी । मुंबई



महाराष्ट्र एसटी कामगार सेनेचा वर्धापन दिन १० मे रोजी शिवसेना नेते तथा माजी केंद्रीय मंत्री खासदार अरविंद सावंत यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी एसटी कामगार सेनेची राज्य कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.एसटी कामगारांवरील अन्यायाविरोधात सातत्याने लढा देणारे धाराशिव आगाराचे ज्येष्ठ चालक अमोल गोरे यांची एसटी कामगार सेनेच्या "राज्य चिटणीस" पदावर निवड करण्यात आली. सरचिटणीस हिरेन रेडकर व कार्याध्यक्ष प्रदीप धुरंदर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही घोषणा करण्यात आली. अमोल गोरे यांनी विविध कर्मचारी प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत संघटनात्मक कामात सक्रिय सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या निवडीमुळे धाराशिव आगारातील कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या निवडीबद्दल खासदार ओमराजे निंबाळकर, जिल्हाप्रमुख तथा आमदार कैलास पाटील यांच्यासह विभागीय अध्यक्ष सुदर्शन जाधव, सचिव अशोक म्हेत्रे, दादा घोडके, राहुल गिराम, आण्णा जाधव, विजय मुंडे, भिमाखोत, संतोष डोरले, उत्रेश्वर डिसले आदींसह असंख्य कर्मचारी बांधवांनी आनंदोत्सव साजरा करत अमोल गोरे यांचे अभिनंदन केले.

# शिवाई संकुलात आंतरराष्ट्रीय नर्सेस डे उत्साहात साजरा

**उमरगा :–** सेवाभाव, समर्पण आणि मानवतेचा संदेश देणारा आंतरराष्ट्रीय नर्सेस डे शिवाई इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगच्या विद्यार्थी परिचारिकांकडून अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. ओम हॉस्पिटल, शिवाई हॉस्पिटल तसेच सिव्हिल हॉस्पिटल येथे आयोजित कार्यक्रमांमधून आरोग्यसेवेत मोलाचे योगदान देणाऱ्या परिचारिकांच्या कार्याला मानाचा मुजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष बी. एच. बेडदुर्गे, उपाध्यक्ष डॉ. अजय बेडदुर्गे तसेच डॉ. सारिका बेडदुर्गे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी डॉ. विजय बेडदुर्गे, डॉ. अर्चना विश्ववेकर तसेच सिव्हिल हॉस्पिटलच्या मेट्रन अंजली शिंदे यांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली..कार्यक्रमादरम्यान डॉ. विजय बेडदुर्गे यांनी नर्सेस डेचे महत्त्व विशद करत परिचारिकांची आरोग्य व्यवस्थेतील भूमिका अधोरेखित केली. तर अंजली शिंदे यांनी विद्यार्थी परिचारिकांना मार्गदर्शन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य अल्विन काळे व उपप्राचार्य डॉ. स्नेहल धर्माधिकारी यांचे सहकार्य लाभले. तसेच प्राध्यापक स्वामिनी जाधव यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन यशस्वीरीत्या पार पाडले.

# मुरूममध्ये शुक्रवारी 'महाराजस्व समाधान' शिबिराचे आयोजन

## उमरगा तहसील प्रशासनाचा पुढाकार; प्रलंबित महसूल प्रश्नांचा जागेवरच निपटारा होणार

आरंभ मराठी । मुरुम

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर (अभियान टप्पा क्र. १) चे आयोजन उमरगा तहसील कार्यालयांतर्गत मुरूम येथे करण्यात आले आहे. हे शिबिर शुक्रवार, १५ मे २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता जिल्हा परिषद प्रशाला (मुलांची), मुरूम येथे संपन्न होईल. सामान्य नागरिकांना शासकीय कामांसाठी वारंवार कार्यालयात फेऱ्या माराव्या लागू नयेत आणि त्यांच्या प्रलंबित समस्यांचे जागेवरच निराकरण व्हावे, हा या विशेष अभियानाचा मुख्य उद्देश आहे.या शिबिरामध्ये महसूल विभागाशी संबंधित खालील विषयांवर तातडीने कार्यवाही केली जाणार आहे. ७/१२ उतारा व फेरफार नोंदींमधील त्रुटी दूर करणे आणि दुरुस्ती करणे, उत्पन्न, जात आणि रहिवासी दाखल्यांबाबत प्रक्रिया व मार्गदर्शन, वारस नोंद, जमीन मोजणी आणि पीक नोंदणी,ई-हक्क प्रणालीतील तांत्रिक अडचणींबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन,नागरिकांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या अर्जांचा निपटारा आदी.तहसीलदार गोविंद येरमे, नायब तहसीलदार अमित भारती यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे नियोजन करण्यात आले आहे. शिबिराच्या ठिकाणी संबंधित महसूल मंडळ अधिकारी, तलाठी, ग्राम महसूल कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या जाणून घेणार आहेत. मुरूम परिसरातील नागरिकांनी आपल्या महसूल विषयक समस्या आणि आवश्यक कागदपत्रांसह या शिबिराला उपस्थित राहावे. आपल्या महसूल नोंदी अद्ययावत करून घेण्यासाठी या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन उमरगा तहसील कार्यालयाने केले आहे.

# कै. रामचंद्र राठोड यांच्या पुण्यस्मरणार्थ पाणपोई सुरु



**मुरुम :–** मुरूम शहरातील नाईकनगर येथे कै. रामचंद्र लोकु राठोड यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त सलग पाचव्या वर्षी राबविण्यात येणाऱ्या एक महिन्याच्या पाणपोई उपक्रमाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या पाणपोईचे उद्घाटन माजी उपसरपंच लक्ष्मण कृष्णा राठोड तसेच पंचायत समिती तुळजापूर येथील लिपिक देविदास मोतीराम राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. उन्हाळ्याच्या तीव्र पार्श्वभूमीवर नागरिकांना थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी अशोक राठोड, धनराज राठोड, दयानंद राठोड, लालशिंग चव्हाण, खिरु राठोड, गणपत चव्हाण, किसन चव्हाण, आकाश पवार, सुभाष राठोड, सुरज पवार, अविनाश चव्हाण, बालाजी राठोड, उत्तम राठोड, दिगंबर राठोड, गुलाब चव्हाण आदी उपस्थित होते. तसेच महिला मंडळातील पेमाबाई चव्हाण, सुवाबाई चव्हाण, केळाबाई राठोड, ताराबाई राठोड, रमाबाई राठोड आणि सविता राठोड यांनीही सहभाग नोंदविला.

# नळदुर्ग रोडवरील उघड्या गटारी ठरताहेत धोकादायक; तातडीने झाकण बसवण्याची नागरिकांची मागणी

आरंभ मराठी । तुळजापूर



तुळजापुर शहरातील नळदुर्ग रोड परिसरात स्टेट बँक ऑफ इंडिया समोरील सर्व्हिस रस्त्यावरील नाल्यांना झाकण बसवण्यात आले नसल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. उघड्या गटारींमुळे या परिसरात अपघाताचा धोका वाढला असून संबंधित प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. नळदुर्ग रोड परिसरात अलीकडेच नव्याने रस्ता तयार करण्यात आला आहे. या भागात बँका, शासकीय कार्यालये तसेच विविध व्यावसायिक आस्थापना असल्याने दिवसभर नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. विशेषतः वयोवृद्ध नागरिक, महिला व लहान मुलांना या उघड्या गटारींमुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. रात्रीच्या वेळी अथवा गर्दीच्या वेळी एखादा नागरिक गटारीत पडून गंभीर जखमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांनी संबंधित महामार्ग प्रशासन तसेच काम करणाऱ्या ठेकेदारांनी या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन उघड्या नाल्यांवर सुरक्षित झाकण बसवावीत, अशी मागणी केली आहे. तसेच संभाव्य अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# परंडा उपजिल्हा रुग्णालयात जागतिक परिचारिका दिन साजरा

आरंभ मराठी । परंडा

परंडा उपजिल्हा रुग्णालयात जागतिक परिचारिका दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधीक्षक डॉ. जुबेर मोमीन होते. या प्रसंगी परिचारिका व परिचारकांच्या आरोग्यसेवेतील अमूल्य योगदानाचा गौरव करण्यात




आला. मान्यवरांनी सांगितले की, परिचारिका हे आरोग्य व्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ असून रुग्णसेवेत त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विशेषतः कोरोना काळात त्यांनी केलेली सेवा ही उल्लेखनीय व प्रेरणादायी असल्याचे नमूद करण्यात आले. कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, परिचारक व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्वांना परिचारिका दिनाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सेवाभावी कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

आरंभ मराठी — कामगारांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष, डम्पिंग ग्राउंडमधील अनियमिततेवर विभागीय आयुक्तांकडे तक्रार दाखल

# नळदुर्गमध्ये घनकचरा व्यवस्थापनावर गंभीर आरोप; टेंडर रद्द व चौकशीची काँग्रेस नगरसेवकांची मागणी

आरंभ मराठी । नळदुर्ग




नळदुर्ग शहरातील घनकचरा संकलन व स्वच्छता व्यवस्थापनाच्या कामात गंभीर अनियमितता होत असल्याचा आरोप करत काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी संबंधित ठेकेदाराचे टेंडर रद्द करून त्याच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे केली आहे. सोमवारी (दि.११) काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. या निवेदनात नळदुर्ग नगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापनाच्या कामात ठेकेदाराकडून मोठ्या प्रमाणात नियमभंग होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. नगरसेवकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित ठेकेदार कंपनीकडून कामगारांच्या सुरक्षिततेकडे पूर्णतः दुर्लक्ष केले जात आहे. शासनाच्या नियमांनुसार आवश्यक असलेले सुरक्षा साहित्य कामगारांना दिले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. कामगारांना सेफ्टी शूज, रेनकोट, युनिफॉर्म, हातमोजे (Gloves) यांसारखी मूलभूत सुरक्षा साधने उपलब्ध करून दिली नसल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याशिवाय कामासाठी आवश्यक मनुष्यबळ व साधनसामग्री अपुरी असल्याने शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कामगारांची हजेरी नोंद व वेतन नोंदी योग्य पद्धतीने न ठेवता कंत्राटातील अटी व शर्तींचे उल्लंघन होत असल्याचा दावा नगरसेवकांनी केला आहे. डम्पिंग ग्राउंड परिसरात कचरा उघड्यावर टाकला जात असल्याने तसेच प्लास्टिक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जात नसल्याने पर्यावरण प्रदूषणात वाढ होत असल्याची गंभीर बाबही समोर आणण्यात आली आहे. या सर्व प्रकारामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे आणि नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे नगरसेवकांचे म्हणणे आहे. यापूर्वीही या संदर्भात मुख्याधिकारी व नगराध्यक्षांना अनेक वेळा लेखी निवेदने देऊनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अधिकारी व ठेकेदार कंपनीवर कठोर कारवाई करावी तसेच ठेकेदाराचे टेंडर तातडीने रद्द करावे, अशी ठाम मागणी काँग्रेस नगरसेवकांनी केली आहे. या निवेदनावर नगरपालिकेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते मारुती खारवे, नगरसेवक आकाश कुलकर्णी, सुधीर पोतदार, झुलेखाबेगम इनामदार, मदिना बागवान, कमलबाई गायकवाड आणि मन्नाबी कुरेशी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप्सवर कारवाई करा

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे सायबर क्राईम विभागाला पत्र

आरंभ मराठी । मुंबई





राज्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांविरोधात परिवहन विभागाने कठोर भूमिका घेतली असून, ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप सेवा तात्काळ बंद करून संबंधित कंपनी मालकांवर एफआयआर दाखल करण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सायबर क्राईम विभागाकडे पत्राद्वारे केली आहे. त्याचबरोबर परिवहन आयुक्त यांनी देखील यासंदर्भात सायबर क्राईम विभागाकडे पत्र पाठविले आहे. मंत्री सरनाईक यांनी पत्रात नमूद केले आहे की, राज्यात गेल्या काही महिन्यांपासून विविध ॲप्सच्या माध्यमातून कोणतीही वैध परवानगी, शासन मान्यता किंवा परिवहन विभागाच्या नियमांचे पालन न करता प्रवासी वाहतूक सुरू आहे. विशेषतः रॅपिडोसारख्या संस्थांच्या अनधिकृत बाईक टॅक्सींचे प्रमाण वाढत असून, ही बाब सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे. या अनधिकृत सेवांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेची कोणतीही हमी नसून चालकांची पडताळणी, विमा संरक्षण, महिला सुरक्षाविषयक उपाययोजना तसेच आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अत्यंत अपुरी असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, शासनाच्या परिवहन नियमांचे खुलेआम उल्लंघन करून या ॲप्समार्फत आर्थिक व्यवहार सुरू असल्याने परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांच्या व्यवसायावर अन्यायकारक परिणाम होत असल्याचे परिवहन विभागाने म्हटले आहे. सायबर क्राईम विभागाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप्सचे ऑनलाईन संचालन तात्काळ बंद करणे, संबंधित ॲप कंपन्या, चालक आणि व्यवस्थापनाविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायदा व मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करणे तसेच कंपनी मालकांवर गुन्हे दाखल करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

आरंभ मराठी